सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामान्य/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ १५२ ठ. क्र. १८४ दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

होम मैदान येथील जागा सर्कस प्रदर्शनासाठी भाडयाने देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. शासनाने मुंबई व मुंबई उपनगरासाठी लागू केलेल्या शासन निर्णयानुसार रक्कम रुपये ३,००,३७०/- इतके भाडे व रक्कम रुपये ७५,०००/- इतके डिपॉझीट एकरकमी ॲडव्हॉन्समध्ये सर्कस चालकाकडून भरुन घेणेस व तद्नंतर सदर जागा भाडयाने उपलब्ध करुन देणेस, तसेच संबंधित प्रकरण मा. स्थायी समिती व मा. सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. १८-६-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मा. स्थायी समिती ठराव क्र. २०० दिनांक २४-७-१५ अन्वये मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढील विषय क्र. १५४ ठ. क्र. १८८ दि. ७।१०।२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ३५ अ मधील शास्त्री नगर डॉ. अन्सारी चौक ते दत्त मंदिर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेकामी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०० दिनांक ८-६-२०१५ अन्वये याकामी प्लॅन व एस्टीमेट करणेस मान्यता देणेत येत आहे. असा ठराव पारित करणेत आला असून, त्याअनुषंगाने प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ६, सन २०१५-१६ र.रु. ३०,६३,७८३/- चे तयार केले असून, याकामी सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील भांडवली कामे रस्ते बांधणे या बजेट सदरातून र.रु. ३०.६४ लाख इतकी बजेट तरतूद होवून मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ४-८-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १५५ ठ. क्र. १८९
दि. ७/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



फौजदार चावडी पोलीस ठाणे, गु.रु.नं.२८२/२०१४ भ.द.वि.स. कलम ३०४, ३४ या गुन्हयातील आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र पाठविण्याकरिता फौजदारी प्रक्रिया व्यवहार संहिता कलम १९७ प्रमाणे मंजूरी मिळणेबाबत प्रस्तावात नमूद आरोपी - सुभाष बळीराम सावस्कर, व सतीश विठ्ठल जाधव हे सोलापूर महानगरपालिकेमध्ये लोकसेवक म्हणून कार्यरत होते व आरोपी सुनिल नेमिनाथ लामकाने हे सोलापूर महानगरपालिकेमध्ये लोकसेवक म्हणून कार्यरत आहेत. फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.रु.नं.२८२/२०१४ या गुन्हयात न्यायालयात दोषारोप पत्र पाठविणेकरता मंजूरी देण्यात आलेली असून सदरची बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ (अ) नुसार मा. महानगरपालिकेस कळविणेबाबत मा. आयुक्त यांचे दिनांक ६-८-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३६७ ठ. क्र. १९० दि. ७/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

नगरअभियंता विभागाकडे एकवट मानधनावर करार पध्दतीने नियुक्त केलेल्या अवेक्षक सेवकास मुदतवाढ देणेबाबत श्री. राहूल गोविंद कांबळे यांची अवेक्षक (स्थापत्य) या पदी दि. २९-१०-२०१३ पासून सहा महिन्याच्या कालावधीकरिता नियुक्त करण्यांत आली होती. तद्नंतर वेळोवेळी त्यांना मुदतवाढ देणेत आलेली असून, त्याची ही मुदतवाढ दि. २-५-२०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे. सबब प्रस्तावात नमूद कारणास्तव नगरअभियंता यांचे निवेदनात नमूद कारणास्तव श्री. राहूल गो. कांबळे यांची मुदत दि. २-५-२०१५ रोजी संपुष्टात आलेली असल्याने त्यांना मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये नव्याने निर्माण केलेल्या अवेक्षक पदास व सदर कार्यरत सेवकास दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढे एक वर्षासाठी मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ४-८-१५ चे टिपणी प्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. २४४, दि. १४-८-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याच धर्तीवर सामान्य प्रशासन विभागाकडील आज्ञापत्र जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/१, सामान्य प्रशासन विभाग सोलापूर दि. ५-८-२०१५ अन्वये मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये निर्माण करणेत आलेल्या अवेक्षक (स्थापत्य) या पदावर १) कु. दिलपाक शिफाली सुभाष - नगरअभियंता २) श्री. मसलखांब मनोज उत्तम - विभागीय कार्यालय क्र. ३ ३) श्री. बागवान अमीर अ. रशीद - विभागीय कार्यालय क्र. ५ ४) श्री. गायधनकर राघवेंद्र कृष्णा - विभागीय कार्यालय क्र. ८ यांना दिनांक ५-१-२०१५ पासून पुढे सहा महिन्याच्या कालावधीकरिता मुळ आज्ञापत्रातील शर्ती व अटीस अधिन राहून मुदतवाढ देणेत आलेली असून सदरची मुदतवाढ संपुष्टात आल्याने त्यांना यापुढे दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील एक वर्षाकरिता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १६८ ठ. क्र. १८१
दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १६ राजेंद्र चौक बस डेपो येथे महिला तिकीट चेकर महिला कंडक्टर यांना स्टाफ रुम तसेच महिला शौचालय बांधून देणेबाबत तसेच पुरुष बंधूसाठी स्टाफ रुम बांधून देणे विषयात नमूद ठिकाणी कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ५२/२०१४-१५ र.रु. १३,३२,८८०/- यांस स्थापत्य समितीची मंजूरी मिळून व कामांस बजेट उपलब्ध होऊन मा. सर्वसाधारण सभेपुढे शिफारस करणेस मा. आयुक्त यांचे दि. ४-८-२०१५ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणास मान्यता मिळणेस्तव मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ६१, दिनांक १२-८-१५ अन्वये मा.म.न.पा. सर्वसाधारण सभेकडे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ७ ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ७६० ठ. क्र. ९६२
दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहरामध्ये प्र.क्र. ११ मधील निराळे वस्ती क्रांती कट्टयालगत सांस्कृतिक सभागृह बांधणे या कामाचे प्रस्तावात नमूद प्रमाणे पूर्वगणनपत्रक क्र. २४/२०१५-१६ र.रु. ९४,१२,०१०/- यांस मा. स्थापत्य समितीची मंजूरी मिळून मा.म.न.पा.सर्वसाधारण सभेकडे अंतिम मंजूरीकरिता सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ११-८-२०१५ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणास मान्यता मिळणेस्तव मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ६२, दिनांक १२-८-२०१५ अन्वये मा.म.न.पा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेकामी आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 952 ठ. क्र. 193
दि. 21/10/2015 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहराचे मंजूर विकास योजनानुसार आरक्षण क्र.१५/५ प्राथमिक शाळा म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार रद्द करुन सदरची जागा रहिवास झोनमध्ये समाविष्ठ करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे आरक्षणाखालील जागा रहिवास वापर विभागात समाविष्ठ करावयाचे झाल्यास मा. सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या ठरावानुसार म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम ३७ मधील तरतुदीनुसार आरक्षण क्र. १५/५ एज्युकेशन परपज इन्क्लुडींग प्रायमरी स्कूल या वापराऐवजी रहिवासी झोनमध्ये समाविष्ठ असा फेरबदल करण्याकरिता नागरिकांकडून सुचना व हरकती मागविण्याकरिता दै. लोकमत व दै. संचारमध्ये शनिवार दि. १६-५-२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-पुणे विभागीय पुरवणी यामध्ये दि. मे २८ ते ३ जून २०१५ रोजी जाहिर प्रसिध्दीकरण दिले असता, सदर प्रकरणी विहीत मुदतीत नागरिकांकडून सूचना/हरकती या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाहीत. तरी सदर फेरबदल मंजूरीचा प्रस्ताव मा. शासनाकडे पाठविण्यांस मान्यता मिळणेकरिता प्रकरण मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. ११-८-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याकामी येणा-या नविन डीपीआर मध्ये विचार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 953 ठ. क्र. 294 दि. 31.10.2015 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान करिता १४ वे वित्त आयोगाचे उपलब्ध निधीतून ५० टक्के निधी ठेवणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे मा. महाराष्ट्र शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत घर तेथे शौचालयाची राबविलेली संकल्पना पूर्णत्वास नेऊन व शहर हागणदारी मुक्त करणेकरिताचे विविध कामकाजासाठी व घनकचरा व्यवस्थापनाकरिता १४ वे वित्त आयोगातून ५० टक्के निधीची तरतूद होऊन त्यातून वैयक्तीक शौचालय बांधकाम अनुदान प्रति लाभार्थी र.रुपये २०००/- तसेच मनपा अनुदान प्रति लाभार्थी र.रु. १०००/- उपलब्ध करुन देण्यास तशा प्रकारचा मा. सर्वसाधारण सभेचा ठराव पारित होऊन मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. ६-८-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढील विषय क्र. १७४ ठ. क्र. २९५
दि. १।१०।२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



उजनी, पाकणी, टाकळी, सोरेगांव व भवानी पेठ वॉटर वर्क्स केंद्र येथे १२५ KVA क्षमतेचे जनरेटर खरेदी करुन बसविणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाकरिता र.रु. ६०,६६,४२०/- चे पूर्वगणनपत्रक तयार करणेत आले असून, याकामी धोरणात्मक निर्णय होणेस व बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ६-८-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/पंप व बीपीटी रिसायक्लिंग करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १७५ ठ. क्र. १९६
दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अक्कलकोट रोड पाण्याची टाकी येथील जागा अंत्यविधी साहित्य विक्री केंद्रासाठी अपंग अर्जदार यांना भाडयाने देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे उक्त ठिकाणचे जागेचे प्रती माह भाडे र.रु. ३७२०/- व जागेचे एक्युपंसी प्राईस र.रु. ३,०१,९४०/- इतके होत आहे. तरी अर्जदार यांनी आपले अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हया सामाजिक सेवा संघटनेचे सभासद असून त्यांची संस्था रजिष्टर नोंद झालेली नाही. तथापि सदर संस्थेने रजिष्टर नोंदणी करणेबाबत संबंधित विभागकडे सादर केलेले कागदपत्रे जोडलेले असल्याचे असे दिसून येते. प्रस्तावात नमूद मा. स्थायी समितीचे ठरावाचे अंमलबजावणी करणेकामी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वये सदर जागा भाडयाने देणेचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेस असलेने अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेचा विषय मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ४-८-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रस्तावातील संबंधितास अक्कलकोट रोड पाण्याची टाकी येथील लगत जवळपासची जागा देणेस मान्यता देणेत येत आहे. सदरची जागा ही १५ बाय १० चौरस फुटाची उपलब्ध करुन देऊन याकामी ५० टक्के ॲक्युपन्सी प्राईस घेऊन व दरमहा ५० टक्के भाडे आकारुन जागा भाडयाने देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-२/१९२ ठ. क्र. ९८७ दि. ७/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/१९२

श्री. एफ. आय. पटनी, संगणक चालक यांना मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव श्री. एफ. आय. पटनी यांना देण्यांत आलेल्या नियुक्तीची मुदत जून मध्ये संपत असल्याने, प्रस्तावात नमूद बाबींचा विचार होऊन त्यांनी केलेले काम हे अत्यंत समाधानकारक असून, त्यांना प्रस्तावात नमूद प्रमाणे मानधनावर पुढील नियुक्तीस मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १-७-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे. मा. स्थायी समिती ठराव क्र. २१९ दिनांक ४-८-१५ अन्वये पुढील मुदतवाढीकरिता मा.म.न.पा.कडे शिफारस करणेकामी आलेल्या प्रकरणी संबंधितास सध्या असलेल्या मानधनावर पुढील आदेश होईपर्यंत नियुक्त देणेस तसेच श्री.एफ.आय.पटणी हे ८ वर्षापासून कार्यरत असलेने त्यांचे नांव सो.म.पा.रोजंदारीच्या क.श्रे.लि.पदाच्या यादीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामान्य/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ज तीत-४ / १९४ ठ. क्र. १९८
दि. ११/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-४/१९४

महाराष्ट्र राज्य वृत्तवाहिनी संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष, तसेच मी मराठी वाहिनीचे प्रतिनिधी श्री. मनिष केत यांची निवड झाली आहे. सोलापूर जिल्हयाला पहिल्यांदाच हा मान मिळाला आहे. यापूर्वी कधीही पत्रकार संघाच्या राज्याच्या अध्यक्षपदी सोलापूर जिल्हयातील व्यक्तींना संधी मिळालेली नव्हती. याबद्दल ही सभा श्री. मनिष केत यांचे अभिनंदन करीत असून, त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा यथोचित सत्कारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच अत्यंत लहान वयात सोलापूरातील टॉपवर असलेल्या इन सोलापूर न्यूज चॅनलच्या प्रमुख पदी श्री. समाधान वाघमोडे यांची निवड झाल्याबद्दल व दैनिक सकाळचे पत्रकार व सोलापूर महानगरपालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. विजयकुमार सोनवणे यांना पांडुरंग तात्या घळसासी विकास पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल आणि दैनिक लोकमतचे संपादक राजा माने यांचे पुणे विभागीय अधीस्विकृती समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज १५१० ठ. क्र. १९९
दि. ३१/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) रस्ते प्रकल्पामध्ये मित्रनगर शेळगी ते दहिटणे हा ३०९०.०० मी. लांबीचा रस्ता मंजूर असून, या योजनेमध्ये सदरचा रस्ता ०.०० ते १३००.०० मिटर पर्यंत २४.०० मिटर रुंदीने केल्यास तेथे लोकांची उलट गैरसोय होणार आहे. कारण एवढया मोठया रुंदीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट होत आहे. कारण लोकसंख्येच्या मानाने हा रस्ता व्यवस्थीत लांबीचा असून रुंदी मात्र २४.०० ऐवजी १८.०० मी. रुंदीचा केल्यास तेथील रहिवाश्यांना सोयीचे होणार आहे. तसेच योजनेच्या नियमाप्रमाणे जर २४.०० मिटर रस्ता केल्यास अनेक खाजगी मिळकतीदेखील रस्त्यामध्ये बाधीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे मिळकतदार हे नुकतेच आपल्या स्वत:च्या खाजगी जागेत रितसर बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यामुळे ते सध्या बांधून राहत आहेत. त्यामुळे रस्ता बाधित झाल्यास मिळकतदारांना महानगरपालिकेकडून नुकसान भरपाई द्यावी लागेल. आजला मनपाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखिची असल्याने, याबाबत रस्ता रुंदीकरण कमी करणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. यामुळे सदर रस्ता हद्दवाढीतील असल्याने आजला लोकसंख्येचा व रहदारीचा व वाहतुकीचा विचार करता, नियमानुसार सदर रस्त्याची रुंदी ही २४.०० मिटर असण्याची आवश्यकता वाटत नाही.

तरी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे फेर बदल करुन, मित्र नगर शेळगी ते दहिटणे ० ते १३०० मी. लांबीचा रस्ता सध्या १८.०० मी. रुंदीने विकसीत करणेस धोरणात्मक मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 150 ठ. क्र. 200
दि. 21/10/2015 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



टी.पी.१ फायनल प्लॉट नं. १२-१३ पैकी एक एकर जागा भावसार क्षत्रिय समाजासाठी स्मशानभूमीसाठी देण्यात आलेले असून या ठिकाणी विविध सुधारणा प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे खालील नमूद १ ते ६ तपशीलानुसार यामध्ये प्रामुख्याने असे १) पाण्याची टाकी र.रु. १,४६,४६५/- २) बर्निंग शेड र.रु. १०,७३,८८७/- ३) हात पंप र.रु. ८६,०९२/- ४) वेटींग शेड र.रु. १२,५८,९४७/- ५) इलेक्ट्रीशियन र.रु. १,४५,१४०/- ६) अंतर्गत रस्ते र.रु. ३,३९,०३८/- असे एकूण ३५,१०,७०५/- असे वरील नमूद कामाचे पूर्वगणनपत्रकानुसार रक्कमेची तरतूद सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील अ.क्र. २२ पान नं. ५ स्मशानभूमी सुधारणा करणे या सदरी असलेल्या र.रु. ३ कोटीच्या तरतूदीतून सदरची रक्कम उपलब्ध करुन देण्यास व वरील नमूद कामे करण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ९६० ठ. क्र. २०९ दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सर्वांना समतेचा, मानवतेचा संदेश देऊन क्षुद्र वर्गाला उन्नतावस्थेत आणण्याचा व सर्वांना समान शिक्षण मिळविण्यासाठी उच्च आणि निच जाती व्यवस्थेला छेद देणारे महान संत शरण श्रेष्ठ केतेश्वर महाराज यांचे स्मरण नेहमी होण्यासाठी त्यांचे नांव सोलापूर शहरातील विजापूर रोडला जाणा-या पत्रकार भवन शेजारील व वॉटरफ्रंट प्रोजक्ट समोरील मुख्य चौकास **महान संत शरण श्रेष्ठ बुरुड केतेश्वर महाराज चौक** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १६१ ठ. क्र. 202 दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील किडवाई चौकातील आयलँडचा आकार हा सध्या अत्यंत मोठया स्वरुपात असून, यामुळे सदर चौकातून ये जा करणा-या नागरिकांची वर्दळीच्या वेळेस वाहतूक करणे अत्यंत गैरसोयीचे होत आहे. यामुळे तेथून मोठा आयलँड असल्याकारणाने तेथील लगतच्या बोळामध्ये वळत असतांनाही अपघात मोठया प्रमाणात होत असून, अनेक नागरिकांना प्राण गमवावे लागले आहेत. यास्तव नागरिकांचे जिवनाची सुरक्षितता व वाहतुकीमध्ये सुव्यवस्था यावी या दृष्टीने तेथील असलेला आयलँड पाडून तेथे नव्याने चौकामध्ये लहान आयलँड बांधून त्या आयलँडमध्ये कारंजा करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 962 ठ. क्र. 203
दि. 9/10/94 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्री. भाऊ प्रल्हाद कारंडे, राहणार गवळीवस्ती, लक्ष्मीपेठ सोलापूर हे गरीब व कष्टाळू असून त्यांची अश्विनी सहकारी रुग्णालय सोलापूर येथे अँजोग्राफी करण्यात आली आहे. अँजोग्राफी वरील उपचारासाठी व त्याला लागणा-या गोळया औषधांसाठी अंदाजे र.रु. १.५० लाख खर्च अपेक्षित आहे. एवढी मोठी रक्कम खर्च करणे त्यांच्या कुवतीच्या बाहेर आहे. त्यांना कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. तरी श्री. भाऊ प्रल्हाद कारंडे यांना त्यांच्या आजारावर उपचार करणेसाठी व पुढील औषधोपचारासाठी जास्तीत जास्त अर्थसहाय्य देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.१६३ ठ. क्र.208 दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१६३

प्रभाग क्र. ७ मधील शाहीरवस्ती या नावाने ओळखले जाणा-या भागातील नागरिक बांधवांनी या ठिकाणी असलेल्या चौकास उदयमुखी चौक असे नामकरण करणेची इच्छा व्यक्त केली आहे. सबब वरील ठिकाणी असलेल्या चौकास **उदयमुखी चौक** असे नामकरण करणेस व सदर नावाचे ग्रेनाईटचे नामफलक तयार करुन घेण्यात येऊन या चौकात बसविण्यांस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १६४ ठ. क्र. २०५
दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



तुळजाभवानी क्रिडा, सांस्कृतिक सामाजिक व बहुउद्देशीय संस्था, ११७ उत्तर कसबा, पत्रा तालीम सोलापूर ही संस्था नोंदणीकृत संस्था असून, नोंदणी क्र.एफ-१८३३७ असा आहे. सदरहू संस्थेस सोलापूर महानगरपालिका कर्मचारी वसाहत जुना जनता शॉपिंग सेंटरच्या समोर गोल्डफिंच पेठ येथे असलेल्या जागेपैकी दक्षिण व पश्चिम या दोनही वसाहतीची जागा सध्या मनपा कर्मचारी वसाहत म्हणून असून, याठिकाणी आजूबाजूस मोठा बाजारपेठ असून, शहरातील प्रसिध्द नविपेठ म्हणून ओळखली जाणारी बाजारपेठ याठिकाणी आहे. सदर इमारत देखील कच्च्या बांधकामाची असून, यामुळे सदर वसाहतीच्या ठिकाणी कमर्शियल कॉम्प्लेक्स उभारल्यास महानगरपालिकेस मोठा उत्पन्नाचा मार्ग मिळणार आहे.

सबब वरील संस्था ही हया जागेत स्वखर्चाने आर्किटेक्चर प्लॅन तयार करणार आहे. सदरहू संस्था स्वखर्चाने बांधकाम करणार असल्याने, त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे अनामत रक्कम न घेता या संस्थेस वरील कर्मचारी वसाहतीची संपूर्ण जागा ही कमर्शियल वापरासाठी आणि शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणेकामी संपूर्ण जागा ९९ वर्षाच्या कराराने व रेडीरेकनर दरानुसार भाडे कराराने देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १६५ ठ. क्र. २०६
दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



न्यु जगजीवनराम हौसिंग सोसायटी, मोदी, येथे आयएचएसडीपी योजना महाराष्ट्र शासन व महानगरपालिकेकडून राबविण्यांत आली आहे. याठिकाणी समोरील बाजूस असलेल्या मोकळया जागेमध्ये तेथील राहणा-या बेरोजगार व व्यावसायिकांकरिता जास्तीत जास्त मिनी गाळे बांधण्यांत यावे. सदरचे गाळे बांधण्याकामी प्लॅन व एस्टीमेट करुन महानगरपालिकेचे वतीने अथवा बी.ओ.टी. तत्वावर गाळे बांधण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मुदतीची~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १७६/१९० ठ. क्र. २०८
दि. २/१०/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

१७६/१९०

विषय क्रमांक १७६ मध्ये विषय क्र.१९० समाविष्ठ करुन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

धर्मनिरपेक्षतेचे मुर्तीमंत प्रतिक आणि अणुशक्ती व क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताच्या अग्निपंखाना स्वदेशीचे बळ देणारे ज्यांची मिसाईल मॅन म्हणून ओळख आहे. ज्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते असे जागतिक महासत्तेचे स्वप्न पाहणा-या व प्रत्यक्षात साकारु इच्छिणा-या या वैभवशाली भारताचे माजी राष्ट्रपती **डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम** यांचे नांव पुणे रोडवरील सायन्स सेंटरला देणेस, येणारे खर्चास व नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज १७७ ठ. क्र. २०८ दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१) प्र.क्र. १८ मधील राजेश कोठे इंग्लिश मेडीयम स्कूल समोरील चौकास **महामुनी मार्कंडेय चौक** असे नाव देणे २) ठाकूर विडी कारखाना एच ग्रुप या चौकास **महात्मा ज्योतिबा फुले चौक** ३) जवाहर नगर पाणी टाकी रस्ता एरोनी घर व रामपूरे घर समोरील चौकास **प्रगती चौक** ४) मुळेगांव रोड, पायलट रोड, जोडणारा रस्ता या चौकास **डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम चौक** वरील नमूदप्रमाणे नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज १५८ ठ. क्र. २०८
दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४७ मधील नविन आर.टी.ओ. ऑफिस ते राजस्व नगर मार्गावरील चौंडीश्वरी मंदिर जाई जुई नगर येथील चौकास **कै. मातोश्री सुगंधा कोळी चौक** असे नांव देणेस याकामी येणारे खर्चास व सदर ठिकाणी नामफलक लावण्यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मान्य/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ...१५९... ठ. क्र. ...२२०...
दि. ...९/१०/२०१५... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळा भैय्या चौक येथे असून, सदरील पुतळया पाठीमागील भिंतीवर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर आधारीत तैलचित्र (शिल्प) कामाकरिता, पोलिस गार्ड रुम व वाचनालयाकरिता रुम, पुतळयाच्या सभोवताली लाईट व इतर सुशोभिकरणासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या अर्थसंकल्पातील निधीतून तरतुद करणेस याकामी प्लॅन व एस्टीमेट करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ १८० ठ. क्र. २११
दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील विजापूर रोड हद्दवाढ परिसरातील नागरी वसाहतीमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. या परिसरामध्ये सैफुल ते बॉम्बे पार्क ८० फुटी डी.पी. रस्ता असून सदर रस्त्यास इंडीयन मॉडेल शाळेकडे जाताना भाग्यलक्ष्मी पार्क जवळ एक मोठा चौक झाला आहे. या चौकास **शिवप्रताप चौक, जुळे सोलापूर** असे नांव देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९८९ ठ. क्र. २९२
दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील विजापूर रोड हद्दवाढ परिसरातील नागरी वसाहतीमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. या परिसरामध्ये सैफुल ते बॉम्बे पार्क ८० फुटी डी.पी. रस्ता असून सदर रस्त्यावर चाणक्य नगर व स्वामी विवेकानंद नगर यामधील होणा-या चौकास **स्वामी विवेकानंद चौक, जुळे सोलापूर** असे नांव देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९८२ ठ. क्र. २२३ दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. प्रभाकर ज्ञानेश्वर पडवळकर एक सुशिक्षित बेकार तरुण आहेत त्यांना नोकरी नाही एक छोटासा चहा कँटीनचा व्यवसाय आहे. त्यावरच त्यांचे कुटूंबाचा उदरनिर्वाह होत होता परंतू छातीत अचानक दुखू लागल्याने डॉक्टरांना दाखविले असता, -हदयाचा त्रास समजले. त्याची शस्त्रक्रिया (एन्जोप्लॉस्टी) करण्याचे सांगितले असून, त्यासाठी जवळ जवळ र.रु. २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार) इतका खर्च येणार असून, त्यांची आर्थिक परिस्थिती एवढा मोठा खर्च करण्याची नसल्याने त्यांनी महानगरपालिकेकडे आर्थिक मदत मिळणेसाठी अर्ज करीत आहे. तरी त्यांना महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १८४ ठ. क्र. २९४
दि. १/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नॅशनल हायवे ते शेळगी ते दहिटणे गाव हा रस्ता २४ मिटर रस्ता मंजूर करुन त्याठिकाणी रस्ता करण्यांत येणार असल्याने, येथील २५० ते ३०० मिळकतदारांना महानगरपालिकेकडून रस्ता रुंदीकरणासाठी नोटीसा देण्यांत आलेल्या आहेत. वास्तविक सदरचा संपूर्ण भाग हा हद्दवाढीचा भाग असून, याठिकाणी १९९२ सालापासून अनेक मिळकतदारांनी महानगरपालिकेकडे रितसर गुंठेवारी रक्कम भरुन बांधकाम परवाना घेऊन, त्यांची घरे बांधलेली आहेत. असे असतांना आता त्यांना नोटीसा देऊन रस्ता करण्यासाठी जागा संपादन करणे म्हणजे सदर मिळकतदारांचे मोठे आर्थिक नुकसान सोलापूर महानगरपालिकेकडून करण्यासारखे आहे.

सबब, नॅशनल हायवे ते शेळगी ते दहिटणे गाव हा २४ मिटर रस्ता करण्या ऐवजी त्याठिकाणी १६ मिटर रस्ता केल्यास तेथील मिळकतदारांना दिलासा मिळणार आहे. आणि पर्यायाने वाहतुकीसाठी कोणता अडथळा निर्माण होणार नाही. याचा विचार होऊन सदरचा रस्ता २४ मिटर रस्ता ऐवजी १६ मिटर रस्ता करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेची तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभा ... ९८५ ठ. क्र. २९५
दि. २।१०।२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

९८५

सोलापूर शहरातील महानगरपालिका बीट पत्रकारांना महापालिकेच्या जलतरण तलावात जलतरणासाठी कायमस्वरुपी पास देण्यास सदरकामी पत्रकारास महापालिका पत्रकारसंघाकडून शिफारस होऊन त्यांना पास देण्याची जलतरण विभागाकडून कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १८६ ठ. क्र. २९६ दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विडी घरकुल येथील जवाहर नगर ते कोटा नगर हा डी. पी. रस्ता लोकवस्ती झाल्यामुळे रद्द करण्यांत आलेला असून, त्याच धर्तीवर जुळे सोलापूर भाग-२ विडी घरकुल येथील जुना सिटी सर्व्हे नंबर ११७/२ब नविन सिटी सर्व्हे ११५/२ब या ठिकाणी १२ मिटरचा रस्ता प्रस्तावित असून, सदर ठिकाणी लोकवस्ती झाल्यामुळे सदरचा प्रस्तावित रस्ता रद्द करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९८७ ठ. क्र. २९७
दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २८ अ मधील सलगरवस्ती येथील अंतर्गत रस्त्यांची आवस्था अतीशय खराब झालेली आहे. या रस्त्यावर लोकांना ये-जा करणे अत्यंत कठीण होत आहे. तरी सलगरवस्ती येथील अंतर्गत रस्ते करणेसाठी शहर व हद्दवाढ भागातील विविध विकास कामे करणे या हेडमधून आधार हॉस्पीटल पासून फिरोज खान यांचे घरापर्यंत तसेच सलगरवस्ती डोणगांव रोड दत्ता घुले यांचे घरापासून ते दत्तात्रय व्यायामशाळे पर्यंतचे रस्ते करणेसाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.त. तात-३/१९३ ठ. क्र. २९८
दि. ११/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/१९३

पुण्याचे शूर मावळे पृथ्वीच्या सर्वात उंच शिखरावर म्हणजे एव्हरेस्ट शिखरावर शनिवार दिनांक १९-५-२०१२ रोजी पोहोचले. सागरमाथा ही पिंपरी चिंचवड मधील संस्था असून, त्यामध्ये सोलापूरचा सुपुत्र श्री. आनंद अशोक बनसोडे याने देखील एव्हरेस्ट शिखर सर केले आहे. त्यांनी सोलापूरचे नांव उज्वल केले असून, त्यांना सोलापूर शहरामध्ये जागा नसल्याने राहण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भूखंड देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-१/१९१ ठ. क्र. २१८ दि. ९/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/१९१

साधी बस व व्हॉल्वो ए.सी. बसच्या तिकीट दर आकारणी विभिन्नता व सुसुत्रीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव दिनांक ११-८-२०१४ पासून परिवहन उपक्रमाच्या तिकीट दरात रु. ५/- च्या पटीत तिकीट दरवाढ करणेत आली. सदर तिकीट दराच्या आकारणीमुळे मधल्या काही टप्याला तिकीट दर समान असल्याने मधल्या गावातील प्रवाशांना तिकीट दर जास्त पडत होता. त्यामुळे मधल्या गावातील प्रवाशी कमी झाले. परिणामतः उपक्रमाच्या उत्पन्नात घट येत होते. तिकीट दरात विभिन्नता व सुसुत्रीकरण केल्यास प्रवाशांना जो जास्त तिकीट दराचा भुर्दंड पडत होता. तो कमी होणार असल्याने मधल्या गावातील प्रवाशी शहर बसने प्रवास करतील व उपक्रमाच्या उत्पन्नात वाढ होईल. या कारणाने तिकीट दरात सुसुत्रीकरण व विभिन्नता करुन ते अडीच पटीत करणेत आलेले आहे. यामुळे तिकीट दरात वाढ होणार नाही. साधी बस व व्हॉल्वो ए.सी. बसचा सुधारीत तिकीट दर आकारणीचा कि.मी. व टप्प्यानुसार सध्या (प्रचलित) व प्रस्तावित तिकीट दर आकारणीचा तुलनात्मक तक्ता प्रस्तावात सोबत नमूद केले असून, नमूद केलेल्या साध्या बसचे व व्हॉल्वो ए.सी. बसचे सुसुत्रीकरण विभिन्नता केलेल्या सुधारीत व प्रस्तावित तिकीट दराच्या तक्त्याचे अवलोकन होवून प्रस्तावित तिकीट दराच्या आकारणीस मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. परिवहन समिती, सो.म.पा. व मा. सर्वसाधारण सभा, सो.म.पा. यांचेकडे सादर करणेस मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक १६-७-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन मा. परिवहन समिती ठराव क्र. २५, दिनांक १७-७-२०१५ अन्वये प्रस्तावित तिकीट दराच्या आकारणीस मान्यता देणेत येत आहे. असा ठराव पारित झालेला असून, तथापि मा. परिवहन व्यवस्थापक यांचेकडील जा.क्र./पव्य/वाहतूक/११९०, मा. परिवहन व्यवस्थापक यांचे कार्यालय दिनांक ३१-७-२०१५ नुसार सोबत जोडण्यात आलेला तिकीट दराच्या विभिन्नतेचा व सुसुत्रीकरणाचा प्रस्ताव मा. परिवहन समिती यांचे शिफारसीने मा. सर्वसाधारण सभा, सो.म.पा. यांचेकडे सादर करणेकामी मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक ३१-७-१५ चे टिपणी प्रमाणे मा. परिवहन समिती ठराव क्र. ५२, दिनांक १७-८-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

दि..9/90/2095 रोजी ठरता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे मा. केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बसेस खरेदी करणेत आलेली असून सदर बसेस या निकृष्ट दर्जाचे असल्याचे मा. परिवहन समितीमध्ये वेळोवेळी चर्चा झालेली असून सदरहू बसपैकी दि. ५-८-२०१५ रोजी एम.एच.१३-बी-९६७१ ही बस मार्गावर जळून खाक झालेली आहे. त्याचप्रमाणे दि. ७-८-२०१५ रोजी देखील एक बसला शॉर्टसर्किटमुळे काही प्रमाणात आग लागलेली होती व सदर आग ही चालकाच्या प्रसंगावधानाने होणारी दुर्घटना टळली.

अशोक लेलँड बसेस हे दि. १६-९-२०१४ पासून परिवहन उपक्रमात दाखल झालेले आहेत. सदरच्या बसेस दाखल झाले पासून आजतागायत सदरचे बसेस मार्गावर बंद पडणे, एअर टाकी निघून पडणे, मार्गावर चाका निघून पडणे, गिअर बॉक्सचे बिघाड इ. अनेक तक्रारी संदर्भात कर्मशाळा विभागातील कर्मचा-यांकडून वेळोवेळी कळविले असताना अशोक लेलँड कंपनीने कुठल्याही प्रकारचे बसेसची तपासणी केलेली नाही.

उपरोक्त नमूद बसेसचे बॉडी बिल्डींग हे निकृष्ट दर्जाचे व असमाधानकारक असल्याने भविष्यात फार मोठया आर्थिक संकटास सामोरे जावे लागणार आहे. आजला सदरहू संस्थेकडून उर्वरीत येणारे ४६ बसेस अशोक लेलँड कंपनीकडून खरेदी करणेत येवू नये असे परिवहन समितीमध्ये चर्चा झालेली आहे. सदर कंपनीने परिवहन उपक्रमास पुरविण्यात आलेले बसेस हे निकृष्ट दर्जाचे असल्याने सदर कंपनीचे नांव काळया यादीमध्ये समाविष्ठ करुन त्यांचा मक्ता रद्द करणेस्तव मा. सर्वसाधारण सभा, सो.म.पा.कडे शिफारस करुन त्यांचे मान्यतेअंती मा. राज्य शासन व केंद्र शासन यांचेकडे शिफारस करणेत यावे. तसेच यापूर्वी मा. परिवहन समितीचे दि. २०-६-२०१५ रोजी विषय क्र. १८ ठराव क्र. २३ अन्वये निकृष्ट दर्जेच्या बसेस पुरविणेबाबत कंपनीस कायदेशीर नोटीस देवून त्यांचेवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणेस परिवहन समितीने एकमताने मान्यता दिलेली होती. यासंदर्भात देखील प्रशासनाकडून कसल्याही प्रकारचे कार्यवाही करणेत आलेली नाही.

सदरच्या ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने त्वरीत केली असती तर दि. ५-८-२०१५ रोजी रेल्वे स्टेशन ते मंगरुळकडे जाणा-या अशोक लेलँडची जन बस क्र. एम.एच.१३-बी-९६७१ ही बस इलेक्ट्रीक शॉर्ट सर्किट होवून केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे रु. ५५.६५ लाखाचे नुकसान झालेले आहे. सदरचे नुकसानीची रक्कम रु. ५५.६५ लाख इतकी रक्कम अशोक लेलँड कंपनीकडून वसूल करणेत यावे. सदर प्रकरणी सदस्यांनी केलेल्या तक्रारीचे प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे गांभीर्य घेतले नाही. अशा बेजबाबदारपणे वागून सोलापूर शहरातील प्रवाशांच्या जिवितास व त्यांच्या सुरक्षिततेसाठी व सोलापूर शहराच्या लौकीकास व परिवहन उपक्रमाच्या प्रतिमेस कलंकित केलेल्या अधिका-यांची चौकशी करुन त्यांचेवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणेत यावा.

अशोक लेलँड कंपनीकडून खरेदी करणेत येत असलेल्या बसेसचा करारनामा रु. १००/- चे मुद्रांकावर केलेला आहे. याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदरच्या करारनाम्यास आक्षेप घेवून रु. ११ लाख इतक्या रक्कमेचा मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करणेबाबत नोटीस दिलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, शासनाचे महसूल बुडवून संबंधित अशोक लेलँड कंपनीचा आर्थिक फायदा करण्याचा प्रयत्न अधिका-यांनी केलेला आहे. याबाबत संबंधित अधिकारी यांचेवर निलंबनाची कारवाई करणेत यावी.

उपरोक्त विषयाचा सारासार विचार करता अशोक लेलँड कंपनीवर कठोर कारवाई करणेस व उर्वरीत ४६ बसेस या इतर कंपनीकडून कमी आसन क्षमतेच्या (मिनी बसेस) जाहिरप्रसिध्दीकरणाने खरेदी करणेस त्याप्रमाणे मा. केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. या संस्थेस पत्रव्यवहार करुन पुढील कार्यवाही ठेवणेकामी मा. परिवहन समिती ठराव क्र. ५१, दिनांक १३-८-२०१५ अन्वये मान्यता मिळणेस्तव मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेकामी आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

याकामी मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका